प्रेस नोट दि. ०६/१०/२०२६

पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ ०२, मुंबई

लो. टि. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई

सायबर फसवणूकीच्या रकमेतून मोबाईल खरेदी करणारी टोळी अहमदाबाद येथून अटक करून एकुण १९,६६,०७५/- रूपये किमतींचे २५ मोबाईल फोन हस्तगत केलेबाबत

लो.टि मार्ग पोलीस ठाणेस दाखल गु.र.क्र. १२५४/२०२६ कलम ३१८(४),३१९(२) भारतीय न्याय संहिता सह कलम ६६(क),६६(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० या गुन्हयातील फिर्यादी यांना अनोळखी मोबाईल क्रमांक धारकाने तो आरबीएल क्रेडिट कार्डकडून बोलत असल्याचे भासवुन फिर्यादी यांच्या आरबीएल क्रेडिट कार्डवर चालु असलेली एम. ओ.(मेल ऑर्डर) सर्व्हिस बंद करण्यासाठी त्यांना त्यांचे व्हॉटसअप क्रमांकवर लिंक पाठवुन त्यांना ती लिंक ओपन करण्यास सांगुन त्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या क्रेडिट कार्डमधुन ०३ ट्रॅन्झॅक्शनव्दारे एकूण रूपये ४,४८,७२१/- ची स्विगी या प्लॅटफॉर्मवर खरेदी करून त्यांची ऑनलाईन फसवणुक केली म्हणुन नमुदचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान, सखोल तांत्रिक तपासाच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपींना कुर्ला आणि अहमदाबाद, गुजरात येथून अटक करण्यात आलेली आहे.

अटक आरोपींचा तपशील पुढीलप्रमाणे:

१) अनिसबेग समिरबेग मिर्झा, वय - २३ वर्षे
२) मोईन रहिम शेख, वय - ३४ वर्षे

नमुद गुन्हयामध्ये अटक आरोपी यांच्याकडून **Apple** या कंपनीचे ०२ मोबाईल फोन तर इतर गुन्हयातील **Apple, Samsung, Google, Vivo** तसेच इतर कंपनीचे २३ मोबाईल फोन असे एकूण २५ मोबाईल फोन हस्तगत केले आहेत.

सदरची उत्कृष्ट कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त(कायदा व सुव्यवस्था), श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त,(द.प्रा.वि.) श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त,(दक्षिण परिमंडळ ०२) श्रीमती रागसुधा आर., मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (पायधुनी विभाग) श्रीमती रेणूका बुवा यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजय दंडवते, पोलीस निरीक्षक श्री संजय देशमुख, सायबर गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक दिग्विजय मेटकरी, पोलीस उप निरीक्षक सतिश बडे, पोलीस उप निरीक्षक अमोल गोगावले, पोलीस शिपाई अविनाश पाटील, पोलीस शिपाई संतोष कचरे, पोलीस शिपाई निलेश झगडे, पोलीस शिपाई अमोल जगदाळे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस हवालदार प्रफुल्ल पाटील, पोलीस हवालदार सागर विचारे व पोलीस शिपाई जगदेव यांनी पार पाडली आहे.